सं.फौ.ख.क्र.५२/२०२५

शासन वि. अमित

नि.क्र.१३

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

नावः निलेश विजयराव पांडे ,

वयः ४६ वर्ष, धंदाः जवान,

पत्ताः निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक २ नागपूर

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.१ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री.एस.व्ही.तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

१. दि. २८/११/२०२४ रोजी मी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक २ नागपूर येथे जवान या पदावर कार्यरत होतो. गुप्त माहीती मिळाली की इटगाव गावी येथे एक इसम अवैध्यरित्या दारु विक्री करीत आहे. या माहितीवरुन अनिल जुमळे व दोन पंच व मी इटगाव या गावी गेलो. तेथे पाण्याच्या टाकीजवळ आरोपी अमित रंगारी च्या राहत्या घरी अवैध्यरित्या देशी दारु विक्री करीत होता. त्याच्या घराची झडती घेतली असता २२ लिटर मोहाफुल दारु मिळून आली. मुद्देमाल जप्त करुन अनिल जुमळे यांनी नमुन्या करीता १८० मिली क्षमतेच्या बॉटलमध्ये मोहाफुल वेगळी काढली त्या पंचासमक्ष सील केल्या. अनिल जुमळे यांनी घटनास्थळी घटनास्थळ पंचनामा तयार केला. मी आरोपीला ओळखतो तो आज न्यायालयात हजर आहे. घटनेची फिर्यादं मी नोंदविली. आता मला ती फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा आहे. त्यास **नि. क्र. १४** देण्यात येते. एक लॅपटाप व प्रिंटर आम्ही सोबत घेऊन गेलो होते, घटनास्थळी पंचनामा तयार करुन प्रिंट काढली.

सरतपास पूर्ण

**आरोपीतर्फे श्रीमती व्ही. टी. चौधरी वकील मॅडल यांचेमार्फत उलटतपास**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. २८/११/२०२४ रोजी मी कर्तव्यावर होते हे

दाखविण्याकरिता हजेरीपटाचा दस्त अभिलेखावर नाही. मी आरोपीच्या घराचा क्रमांक सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की,घटनास्थळ पंचनामा कार्यालयात तयार करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, इटगाव गावी गेलो नाही व आरोपीच्या ताब्यातून मोहाफुल दारु मिळून आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, केसेसचा कोटा पूर्ण करण्याकरिता खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा या गुन्हयाशी काहिही सबंध नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत, | समक्ष |
| GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.11.21 16:58:36 +0530 | GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.11.21 16:58:42 +0530 |
| **(जी.ओ. वानखडे)** | **(जी.ओ. वानखडे)** |
| न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी | न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी |

दिनांकः २१/११/२०२५